महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल -mahajyotingp@gmail.com


# MBA-CAT/CMAT-CET- 2024-25 परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता योजनेचा तपशील

MBA-CAT/CMAT-CET परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरिता इतर मागास, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन- 2024-25 करीता MBA-CAT/CMAT-CET च्या पूर्वतयारीसाठी मोफत ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने महाज्योती मार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

- **प्रशिक्षणाचा कालावधी** - 6 **महिने**
- **विद्यावेतन** - 10,000/- **प्रतिमाह (किमान** 75% **उपस्थिती असल्यास)**
- **आकस्मिक निधी** - 12,000/- **(एकवेळ)**

## ➢ योजनेच्या लाभासाठी पात्रता व निवड प्रक्रिया :

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा/असावी.
3. उमेदवाराने पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावा/असावी.
4. यापुर्वी महाज्योतीच्या योजनांचा कोणत्याही स्वरुपात लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी चालू योजनेसाठी पुन्हा अर्ज करु नये, अश्या उमेदवारांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.
5. प्रशिक्षणाकरीता लाभार्थी विद्यार्थ्याची अंतिम निवड चाळणी परिक्षेद्वारे करण्यात येईल.
6. विद्यार्थ्यांची MBA-CAT/CMAT-CET पूर्व परीक्षेच्या धर्तीवर व अभ्यासक्रमानुसार चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
7. चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांकनानुसार मेरीटच्या आधारे व आरक्षित जागांच्या प्रमाणात पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

## ➢ प्रशिक्षणाचे स्वरूप :

1. विद्यार्थ्यांना परीक्षांचे सुधारित अभ्यासक्रमानुसार MBA-CAT/CMAT-CET परीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्यात येईल.
2. सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा 6 महिन्यांचा असेल.
3. प्रशिक्षण अनिवासी स्वरुपाचे असेल.
4. प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपात देण्यात येईल.

## ➢ आरक्षण :

**सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | इतर मागास वर्ग (OBC) | 59% |
| 2 | निरधीसुचीत जमाती - अ (VJ-A) | 10% |
| 3 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 8% |
| 4 | भटक्या जमाती - क (NT-C) | 11% |
| 5 | भटक्या जमाती - ड (NT-D) | 6% |
| 6 | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | 6% |
| | **एकूण** | **100%** |

**समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे :**

1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
2. दिव्यांगाकरिता 4% जागा आरक्षित आहे.
3. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

## ➢ अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:

1. आधार कार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate)
3. रहिवासी दाखला (Domicile Certificate)
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
5. पदवीचे प्रमाणपत्र/गुणपत्रिका
6. दिव्यांगाचे प्रमाणपत्र (दिव्यांग असल्यास)
7. अनाथ असल्यास दाखला

## ➢ अर्ज कसा करावा ?

1. महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application for MBA-CAT/CMAT-CET - 2024-25 Training" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.
3. उमेदवाराने अर्जामधील दिलेली सर्व माहिती पूर्ण भरायची आहे त्याशिवाय योजनेकरीता नोंदणी अर्ज वैध मानले जाणार नाही.

## ➢ अटी व शर्ती :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.10/07/2024 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये भरुन दिलेली माहिती अंतिम मानली जाईल.

4. विद्यार्थ्याने अर्ज करतेवेळी पहिल्यांदा निवडलेल्या परीक्षेकरीता जिल्ह्याचे प्राधान्य प्रवेश परीक्षेकरीता कायमस्वरुपी गृहीत धरल्या जाईल. त्यात कोणत्याही प्रकारचे बदल करता येणार नाही.
5. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
6. प्रशिक्षणाकरीता निवड झालेले विद्यार्थी ज्या दिनांकास प्रशिक्षण संस्थेत रुजु होतील त्या दिनांकापासुन त्यांना महाज्योतीच्या धोरणांनुसार विद्यावेतन लागू होईल. तथापि प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्यांनाच विद्यावेतन देय राहिल.
7. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या दरम्यान किंवा प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास अथवा उमेदवाराने यापूर्वी महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी 'या संस्थे मार्फत योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
8. महाज्योतीच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतला असल्यास विद्यार्थी या प्रशिक्षणास अपात्र ठरेल.
9. नमुद निकषांची पूर्तता न करणाऱ्या, अपूर्ण अर्ज सादर करण्याऱ्या किंवा अर्जासोबत कागदपत्रे न सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अर्ज बाद करण्यात येईल.
10. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक असून विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे विद्यावेतन त्यांच्या आधार कार्ड नंबरशी संलग्न असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात येण्यात असून सदर बाबीची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
11. कोणत्याही विद्यार्थ्यांस कोणत्याही कारणाने पूर्वलक्षी प्रभावाने विद्यावेतवन तसेच आकस्मिक निधीचा लाभ मिळणार नाही.
12. योजनेसंबंधित कोणतेही बदल झाल्यास त्याबाबतच्या सुचना वेळोवेळी महाज्योतीच्या संकेतस्थळावर देण्यात येईल.
13. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास महाज्योतीच्या Call Centre वर संपर्क करावा **संपर्क क्र** - 0712-2870120/21

    E-mail Id : mahajyotihelpdesk@gmail.com

    **संस्थेचे संकेतस्थळ (Website):** www.mahajyoti.org.in

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.